# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचेकार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे.
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. – ३४५/२०२२** **दिनांक – २०/११/२०२२**

## बंगाली कामगाराचा चाकुने खुन करुन पळुन गेलेल्या तिनही बिहारी आरोपीना सुरत येथुन ताब्यात घेवुन २४ तासात गुन्हयाची उकल / वालीव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगीरी

वालीव पोलीस ठाण्याचे कार्यकक्षेत असलेल्या बिल्ड फॅब स्ट्रक्चर सिस्टम कंपनी ठाणे यांनी त्यांचे कंपनीत काम करत असलेल्या मजुरांना वसई पुर्व कामण येथील रॉयल इंडस्ट्रियल हब, शिलोत्तर, येथील एहसान सिद्दीकी यांचे चाळीतील रुममध्ये राहण्याची व्यवस्था केली होती. दि.१७/११/२०२२ रोजी सायकांळी ०६.३० वाजताच्या सुमारास सदर ठिकाणी राहत असलेले इसम नामे जयंतो मंडल व साहिल मेहफुज सिद्दीकी यांचेत रुममध्ये सामान ठेवण्याचे किरकोळ कारणावरुन भांडण झाले असता यातील इसम नामे १) मेहफुज आलम जमिरुद्दीन सिद्दीकी वय-५० वर्षे, मुळ गाव- गळहणी, ता.चरपोखरी जि.भोजपुर, राज्य- बिहार, २) साहिल मेहफुज सिद्दीकी वय-२५ वर्षे, मुळ गाव- गळहणी, ता.चरपोखरी जि.भोजपुर, राज्य- बिहार, ३) राजा पुर्ण नाव पत्ता माहीती नाही यांनी मिळुन जयंतो मंडल यास परत शिवीगाळी करुन ठोश्याबुक्क्याने मारहाण करुन साहिल मेहफुज सिद्दीकी याने त्याचेजवळ असलेल्या बॅगेतुन चाकु काढुन चाकुने इसम नामे जयंतो मंडल याचे अंगावर वार करुन त्याचा खुन केल्याने यातील फिर्यादी यांनी वर नमुद इसम यांचे विरुध्द फिर्याद दिल्याने सदर बाबत वालीव पो.ठाणे गुन्हा नोंदक्र. I १२०५/२०२२ भा.द.वि.सं कलम ३०२, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे दिनांक – १८/११/२०२२ रोजी दाखल करण्यात आला होता गुन्हा केल्यानंतर आरोपीत हे त्यांचे फोन बंद करुन सदर ठिकाणावरुन फरार झाले होते.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषन व गुप्तबातमीव्दारा कडुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयातील आरोपीताचे शोधार्थ वेगवेगळी पथके तयार करुन त्यातील एक पथक सुरत राज्य- गुजरात येथे पाठवुन सदर पथकाने आरोपीत नामे १) मेहफुज आलम जमिरुद्दीन सिद्दीकी वय-५० वर्षे, मुळ गाव- गळहणी, ता.चरपोखरी जि.भोजपुर, राज्य- बिहार, २) साहिल मेहफुज सिद्दीकी वय-२५ वर्षे, मुळ गाव- गळहणी, ता.चरपोखरी जि.भोजपुर, राज्य- बिहार, ३) राजाबाबु श्रीनाथमंगल सिंह वय- ३२ वर्ष, रा. अनाई, ता.नवादा, जि.भोजपुर राज्य- बिहार हे सुरत राज्य- गुजरात येथे एकत्र येवुन त्यांचे मुळ गावी बिहार येथे जाण्याच्या तयारीत असतांना दिनांक – १९/११/२०२२ रोजी सुरत राज्य- गुजरात येथुन ताब्यात घेवुन पोलीस ठाण्यात आणुन त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.नि./मिलींद साबळे हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग तथा अतिरिक्त कार्यभार सहायक पोलीस आयुक्त तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.मिलींद साबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पो.हवा, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतिश गांगुर्डे, पो.ना/बाळु कुटे, पो.अंम- सचीन खताळ, सचीन मोहीते, जयवंत खांडवी, ज्ञानेश्वर पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली.


वालीव पोलीस ठाणे
महाराष्ट्र राज्य पोलीस
महाराष्ट्र राज्य पोलीस